# मृद्गंध



▪ सदानंद बोरकर

# झाडीपट्टीचे लोकनाट्य दंडार

**पूर्व विदर्भातील** चहुबाजूंनी झाडीपट्टी रंगभूमीचं वय दीडशे वर्षांहून अधिक असल्याचे पुरावे आहेत. त्यापूर्वीची रंगभूमी कोणती? हा प्रश्न वाचकाला पडणे स्वाभाविक आहे. त्या प्रश्नाचं उत्तर आहे 'दंडार'. दंडार ही झाडीपट्टीतील लोकनाट्य आणि लोकगीते जपणारी लोककला आहे. लोकसंस्कृतीचे प्राचीन दर्शन या कलेतून होते. दंड म्हणजे शासन किंवा शिक्षा. दंड म्हणजे काठी किंवा सोटा. दंड म्हणजे शेत. असे दंडारीमधील दंडाचे अनेक संदर्भ आहेत. हातात दोन दंड घेतलेल्या गोंड आदिवासी किंवा इतर जातीच्या माणसांनी दिवाळीच्या दिवशी केलेले दंडनृत्य म्हणजे 'दंडार' असल्याचे 'भंडारा जिल्हा गॅझेटिअर' म्हणते.

दंडारीत सामूहिक नृत्य व सोबत सोंग असतात. कथा पौराणिक आख्यानावर आधारित असते. सूत्रधार प्रमुख गायक असतो. इतर साथीदार असतात. शाब्दिक विनोद असतो. पाटील-देशमुख अशा सधन जातीच्या लोकांनी पिढ्यान् पिढ्या जोपासलेली ही कला आहे व ती जुन्या ग्रीक रंगभूमीला जवळची आहे, असा उल्लेख धनंजय नाकाडे यांनी त्यांच्या ग्रंथात केला आहे.

झाडीपट्टीतील उपलब्ध संदर्भग्रंथांच्या तपशिलावरून दंडारीचे दोन प्रकार आढळतात. १) भडकी दंडार आणि २) प्रसंगी दंडार

भडकी दंडार ही स्वयंस्फूर्त असते. या दंडारीच्या सादरीकरणाला फारशी प्रॉपर्टी लागत नाही. मागे एक पडदा, समोर एक माईक आणि एक मोठा कंदील असला म्हणजे झाले. स्त्रियांच्या भूमिका पुरुषांनीच करायच्यात, ही प्रथा आहे. मेकअपसाठी भडक रंगाचा वापर केला जातो. त्यासाठी पोमेडमध्ये घोटलेल्या पिवळा-तांबडा गेरू, काजळ या रंगांचा वापर केला जातो. या प्रकारच्या दंडारीत डफली, चिपळ्यांच्या तालावर सामूहिक नृत्य करण्याची प्रथा होती. अंगविक्षेप आणि शाब्दिक विनोदाला या प्रकारात अधिक स्थान आहे. ही आदिवासी-बलुतेदार यांची कला असल्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आढळतो.

अशा प्रकारच्या दंडारीत सूत्रधारच प्रमुख गायक असतो. त्याला सोबत करणारे साथीदारसुद्धा असतात. टाळ, ढोलके आणि तुणतुणे इत्यादी पारंपरिक वाद्यांचा उपयोग या दंडार प्रकारात पाहायला मिळतो. यातील सामूहिक नृत्य वेगवान असतात.

'खडी दंडार' हा लोकनाट्याचा सर्वात लोकप्रिय प्रकार मानला जातो. दिवाळीनंतर मंडईत (जत्रा) खडी दंडार दाखवण्याची प्रथा गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांच्या गावांमध्ये पाहायला मिळते. खडी दंडारच्या धर्तीवर खडी गंमत आणि खडा तमाशा जन्माला आला. खडी दंडारप्रमाणे बैठी दंडार पण प्रचलित आहे. गायक, ढोलक्या, तुणतुणेवाला, झांजवाला इत्यादी साथीदारांच्या सोबतीनं बसून प्रयोग सादर करतात, त्या प्रकाराला 'बैठी दंडार' म्हणतात.

तसं दंडारीचं खरं स्वरूप म्हणजे छोटासा रंगमंच, रंगवलेल्या पडद्याची सिनसिनेरी, प्रासंगिक वेशभूषा, तमाशाप्रमाणे दंडारीतसुद्धा पडद्यामागून गण म्हणण्याची पद्धत आहे. सुरुवातीला नमन म्हटले जाते. सूत्रधार प्रेक्षकांमधून मार्ग काढत रंगमंचावर येण्याची प्रथा आहे तसेच विदूषक



हातात दोन डहाळ्या हलवत प्रवेश करण्याची प्रथा आहे. सुरुवातीला सूत्रधार गणपतीची स्तुती करतो आणि काही क्षणात गणपतीचा प्रवेश होतो. गणपतीची आरती होते. हा झाला दंडारीचा पूर्वरंग. त्यानंतरचा भाग म्हणजे उत्तररंग. या प्रकारात काही खडे सोंग, गंमत व झडत्या सादर करण्याची प्रथा आहे. हा दंडारीचा मुख्य भाग. त्यात धार्मिक आणि पौराणिक कथांवर आधारित प्रसंग दाखवतात. आजकाल कौटुंबिक आणि सामाजिक विषयावरचे प्रसंग सादर केले जातात. यात दोन-चार भाषणानंतर लगेच पद म्हणायची प्रथा आहे. प्रत्यक्ष काम करणाऱ्या पात्रांसोबत पडद्यामागून काही कोरस मंडळी आणि समोर बसलेले वादक गाणं म्हणायला मदत करतात. द्रुत लयीत चढ्या पट्टीत गाणं म्हणायची पद्धत म्हणजे दंडारीची ओळख होय. रात्री दहा वाजता सुरू झालेली दंडार पहाटे पाचपर्यंत सुरू असते. शेतकरी, कष्टकरी, मजुरी करणाऱ्या कलावंतांसाठी दंडारनाट्य म्हणजे अभिव्यक्तीचं सशक्त आणि आवडीचं माध्यम होय. दंडार लोकनाट्यात बोलण्यापेक्षा गद्यात संवाद साधण्यास जास्त महत्त्व आहे. हेच दंडारीचं खास वैशिष्ट्य होय.

वर्तमानकाळात सुरू असलेल्या दंडारनाट्यात स्त्रियांनी सादर केलेली दंडार आणि पुरुषांनी सादर केलेली दंडार ही वेगवेगळी असते. स्त्रियांनी सादर केलेल्या दंडारीत पुरुष पात्रसुद्धा स्त्रियाच वठवतात, तर पुरुषांच्या दंडारीत सर्व भूमिका पुरुषच वठवतात. स्त्रियांच्या दंडारीसाठी लावलेल्या गाण्यांच्या चालींना लवचीक आणि ठसकेदार चाल तर पुरुषांच्या दंडारीसाठी लावलेल्या गाण्यांच्या चालींना गरड चाल म्हणतात. प्रदेशानुसार या नावांमध्ये बदल झालेला दिसतो. पूर्वापार चालत आलेल्या पौराणिक दंडारींमध्ये दिवाण आणि नारदाचं पात्र असतं. ही दोन्ही पात्रं दंडारीत विनोद निर्माण करण्यासाठीच वापरली जातात. आजच्या कौटुंबिक व सामाजिक दंडारीत दिवाणाचे पात्र आताही पाहायला मिळते. 'डाकू धर्मात्मा', 'वीरसेन', 'बहीणभावाचं कारस्थान', 'जय चंडिका', 'भारताची दैना', 'मंजुळा वनवास', 'सासूच्या घरात जावयाची वरात', 'विहीणबाई सांभाळ तुझी', 'शिकलेली बाई घर वाचा जाई', 'गृहलक्ष्मी', 'सासूबाई सांभाळा स्वतःला', 'आई दीप तुझ्या वंशाचा', 'रण रक्ताने रंगले', 'मातीत मिसळले मोती' इत्यादी अनेक दंडारनाट्य आजही या मातीत सादर होत आहेत.

दंडारनाट्य लिहिणारा बोटावर मोजण्याइतकेच एखादा दंडार कलावंत असतो. तो फार शिकलेलासुद्धा नसतो. दंडारसंहिता छापील स्वरूपाच्या कधीच नसतात. प्रयोग पूर्णपणे मोकळा सादर केला जातो. दंडारीत काम करणारा कलावंत त्यानिमित्ताने आपली सजण्याची हौस पूर्ण करतो. राजाचं काम करताना त्याला डोक्यावर मुकुट हातावर पट्ट्याला लावून प्रवेश करायला काहीच संकोच वाटत नाही. प्रेक्षकही त्याच्या त्या रूपाचं टाळ्यांनी स्वागत करतात. प्रयोगात प्रेक्षक दंडार मंडळाला आणि ज्या कलावंतांची भूमिका आवडली, त्याला स्वखुशीने बक्षिसे देतात. दंडारीत प्रॉम्प्टरची भूमिका फार महत्त्वाची असते. तोच पडद्यामागून सर्व गाणी म्हणतो. दंडारीतील गाण्यांच्या चाली मार्गांच्या नावावरून पडलेल्या असतात. दंडारनाट्याची जुनी लोकपरंपरा लोकरंगभूमीवर विद्यमान असल्यामुळेच झाडीपट्टीत संगीतप्रधान आधुनिक नाटकांना मोठा रसिकवर्ग उपलब्ध झाला. येथील गौरवशाली नाट्यपरंपरेला दंडारीसारख्या लोकनाट्याचा वारसा असल्यानेच पूर्व विदर्भातील झाडीपट्टीचं नाटक आज दिमाखात उभं आहे. *(लेखक-चित्रकार, नाट्यकलावंत, नाट्यलेखक, दिग्दर्शक, नेपथ्यकार म्हणून परिचित आहेत.)* भ्रमणध्वनी : १०२२२३३६२२